<u>निशाणी क्र. ५४ वरील आदेश</u>
<u>(दि. १७ मार्च, २०१८)</u>
**<u>(CNR NO. MHPU02-001120-2014)</u>**

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) प्रमाणे दावा मुदतीत नसल्यामुळे दावा नाकारण्यासाठी सादर केलेला आहे.

२) प्रतिवादी अर्जात म्हणतात की, वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द विशिष्ट अनुतोषासाठी, ठराव व मनाई हुकूमासाठी सादर केलेला आहे. वादींचे कथनानुसार वादी व प्रतिवादींमध्ये दि. १७/०१/२००७ रोजी विसार पावती झालेली आहे. त्यानुसार दि. ११/०१/२००७ रोजी दाव्यास कारण घडल्याचे दावा कलम ८ मध्ये नमूद केलेले आहे. त्यानंतर कुलमूखत्यारपत्र व विसार पावती रद्द केल्याची नोटीस दि. ०६/०४/२०१० रोजी प्रतिवादींनी वादींना पाठविलेली आहे. वादींनी प्रतिवादींना दिलेले धनादेशसुध्दा वादींनी थांबविलेले आहेत. तरी दि. १७/०१/२००७ नंतर दि. १८/०२/२०१४ मध्ये वादींनी सदरचा दावा दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा दाव्यास कारण घडल्यानंतर ०८ वर्षांनी दाखल केलेला आहे. मुदतीच्या कायदयाच्या तरतुदीनुसार दाव्यास कारण घडल्यापासून ०३ वर्षांचे आत दावा दाखल करणे आवश्यक आहे. दावा मुदतीत नसल्यामुळे तो नाकारण्याची विनंती प्रतिवादी करतात.

३) वादींनी स्वतःचे म्हणणे सादर करुन प्रतिवादींच्या अर्जाला प्रखर विरोध केला. प्रतिवादींनी केलेले वाद कथन त्यांनी संपूर्णपणे नाकारले. वादींनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी दाखल केलेला आहे. वास्तविक, नि.क्र. ३३ वर आदेश करताना न्यायालयाने मुदतीचा मुद्दा तथ्यहीन असल्याने फेटाळलेला आहे. त्यामुळे कायदयाने पुन्हा तोच मुद्दा उपस्थित करणे अपेक्षित नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्याची विनंती वादी करतात.

४) अर्ज व खुलासा वाचला. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. दावा काळजीपूर्वक तपासला. दाव्यातील मथळयावरुन असे दिसते की, दावा विशिष्ट अनुतोषासाठी, ठराव व मनाई हुकूमासाठी सादर केलेला आहे. दावा कलम ८ मध्ये दाव्यास घडलेले कारण नमूद केलेले आहे. त्यात वादींनी दि.११/०१/२००७ रोजी त्यांच्यात विसार पावती दस्त झाला, कुलमूखत्यारपत्र दि. २३/०१/२००८ रोजी झाले. सदरचे कुलमूखत्यारपत्र दि. ०६/०४/२०१० रोजी नोटीस काढून रद्द झाले, दि. २२/०१/२०१३ रोजी वादींनी प्रतिवादींना नोटीस काढली, त्या रोजी घडले, तसेच प्रतिवादींमध्ये आपसात दावा मिळकतीबाबत वाटणीचा दस्त दि. २२/०२/२०१३ रोजी झाला, पुढे त्या अन्वये फेरफार दि. ०२/०५/२०१३ रोजी नोंदविले गेले, त्यावेळी सुध्दा घडल्याचे नमूद केलेले आहे. दाव्यास घडणारे कारण हे केवळ एखादी घटना नसून, अनेक घटनांचा संच व प्रवास असतो, या अनेक घटना वादींनी दाव्यात कथन केलेल्या आहेत.

५) दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) प्रमाणे असणारा अर्ज निकाली काढत असताना केवळ दाव्यात नमूद कथनेच विचारात घ्यावयाची असतात. या प्रस्थापित नियमानुसार केवळ दावा, दाव्यातील मथळा व त्यातील विनंती कलमे लक्षात घेता दावा कलम ८ प्रमाणे दाव्यास कारण घडल्याचे व तो मुदतीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. तसा उल्लेख व निष्कर्ष मी नि.क्र. ३३ वर आदेश पारित करीत असताना - सुध्दा काढलेला आहे. त्यामुळे दावा मुदतीत नाही, असे कुठलाही पुरावा आल्याशिवाय म्हणणे न्यायोचित ठरणार नाही. एकदा मुदतीच्या मुद्दयावर चर्चा करुन त्यावर निष्कर्ष काढल्यानंतर प्रतिवादींनी पुन्हा तसाच अर्ज सादर केलेला आहे. सदरचे प्रतिवादीचे वर्तन हे दावा लांबणीवर टाकण्याचे दिसत आहे.

६) प्रतिवादींनी त्यांच्या अर्जाच्या समर्थनासाठी खालीलप्रमाणे मा. वरीष्ठ न्यायालय यांच्याकडे चाललेल्या खटल्यांचे निकालपत्रे सादर केलेले आहेत.

*'Fatehji and Company and Anr. Vs. L.M. Nagpal & Ors., (2015 DGLS(SC) 528*',

माझेसमोरील घटना व वस्तुस्थिती मा. वरीष्ठ न्यायालय यांचेसमोरील खटल्यापेक्षा भिन्न आहे. माझेसमोरील दाव्यामध्ये प्रथमदर्शनी किंवा वरवर, कोणताही पुरावा न घेता मुदतीच्या मुद्दयावर दावा संक्षिप्तपणे नाकारुन चालणार नाही. न्यायाच्या रक्षणासाठी उभय पक्षांना या मुद्दयावर आपापले पुरावे सादर करण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे. म्हणून मी वरील निकालपत्र व त्यातील मार्गदर्शक तत्वे या अर्जाकामी विचारात घेत नाही.

'***a) Manohar @ Prabhakar Purushottamrao Wakil (Dead) through Lrs and others Vs. Goma Nagoji Kamble (Dead) through Lrs and others, (2015 DGLS (Bom.) 24 and***

***b) Kunda Khemraj Choudhary (Dr.) Vs. Mathurabai Mahadu Jadhav and others, (2015(6) Bom.C.R. 332***',

या दोन्हीही खटल्यांमध्ये मुदतीच्या व विशिष्ट अनुतोषाच्या मुद्दयावर अंतीम न्यायनिर्णय होवून त्याबाबत मार्गदर्शन केलेले आहे. परंतु, माझेसमोरील दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) च्या सुनावणीच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे वरील दोन्ही निकालपत्रे या दाव्याकामी विचारात घेत नाही, असे सविनय नमूद करते.

७) युक्तिवादादरम्यान वादींतर्फे सांगण्यात आले की, मुदतीचा मुद्दा इतर मुद्दयांसोबत काढला, तर कोणालाही नुकसान होणार नाही. मी वर नमूद केल्याप्रमाणे मुदतीच्या मुद्दयावर वादींनी केवळ दाव्यात कथन केलेले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी तरी दावा मुदतीत असल्याचे दिसत आहे. परंतु, पुराव्याच्या वेळी याबाबत सविस्तरपणे आढावा घेता येईल. त्यामुळे इतर मद्दयांसोबत हा

अतिरक्ति मुद्दा काढून मुद्दे पुर्नगठीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. त्याप्रमाणे मी आवश्यक ते आदेश पारित करीत आहे.

८) वादी व प्रतिवादींचा युक्तिवाद, दावा व मी वर केलेली चर्चा लक्षात घेता, प्रस्तुतच्या अर्जामध्ये मला आज रोजी कोणतेही तथ्य आढळून येत नाही. त्यामुळे तो नामंजूर करणे, योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश,

## आदेश

१) प्रस्तुतचा नि.क्र. ५४ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

दि. १७/०३/२०१८

(सौ. सुनयना स. पिंगळे)
११ वे सह. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
पुणे.

**"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**

**Name of the Steno : Smt. K.C.Berad**
**Court Name : Smt. S.S. Pingle**
**11th Jt. Civil Judge (S.D.), Pune.**
**Date : 17.03.2018**
**Order signed by presiding officer on : 17.03.2018**
**Order uploaded on : 17.03.2018."**